p/mc minutes

# मुंबई विद्यापीठ

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

मसुदा

क्रमांक ७ /२०२०-२१

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२०-२१ मधील १३.१०.२०२० च्या बैठेकिचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सातवी बैठक मंगळवार दिनांक १३.१०.२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर उद्भावलेल्या परिस्थितीमुळे ही सभा क्लाउड व्हिडियो मीटिंग (ZOOM APP) द्वारे आभासी पद्धतीने घेण्यात आली. बैठकीमधे खालील मान्यवर उपस्थित होते:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रा सुहास पेडणेकर (कुलगुरु) | अध्यक्ष |
| २ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र. कुलगुरु) | सदस्य |
| ३ | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४ | प्रा राजेश खरात | सदस्य |
| ५ | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ६ | प्रा माला लालवाणी | सदस्या |
| ७ | प्राचार्य महादाप्पा गोंडा | सदस्य |
| ८ | प्रा. वैभव नरवडे | सदस्य |
| ९ | श्री रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १० | ॲड. नील हेळेकर | सदस्य |
| ११ | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२ | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३ | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४ | प्रा.बी. एन. जगताप | सदस्य |
| १५ | डॉ. विनोद पाटिल, प्रभारी कुलसचिव व संचालक - परीक्षा व मुल्यमापन मंडळ | सदस्य - सचिव |
| १६ | डॉ कविता लघाटे (प्रभारी वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

## स्वागत

काही तांत्रिक कारणामुळे प्रभारी कुलसचिव यांचा आवाज येत नसल्यामुळे प्र-कुलगुरु यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली. मा. अध्यक्षांनी सभेची कार्यवाही सुरू करण्यास अनुमती प्रदान केली.

p/mc minutes

# श्रद्धांजली

## श्री केशवानंद भारती

केरळ मधील धर्मगुरू श्री केशवानंद भारती यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०६ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षाचे होते.

## श्रीमती मंगला विधाते

मुंबई दूरदर्शनावरील पहिली लावणी सादर करणा—या नृत्यांगणा श्रीमती मंगला विधाते यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०६ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७० वर्षाच्या होत्या.

## डॉ. गोविंद स्वरूप

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०७ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षाचे होते.

## श्रीमती मीना देशपांडे

ज्येष्ठ लेखिका श्रीमती मीना देशपांडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०७ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षाच्या होत्या.

## स्वामी अग्निवेश

ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते स्वामी अग्निवेश यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षाचे होते.

## श्री. माधव कोंडविलकर

ज्येष्ठ साहित्यिक श्री माधव कोंडविलकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षाचे होते.

## श्री. रघुवंश प्रसाद सिंह

बिहारचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री श्री रघुवंश प्रसाद सिंह यांचे दिर्घ आजाराने दिनांक १३ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षाचे होते.

## श्रीमती कपिला वात्स्यायन

ज्येष्ठ लेखिका कलासमीक्षक श्रीमती कपिला वात्स्यायन यांचे दिर्घ आजाराने दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९२ वर्षाच्या होत्या.

## श्रीमती ललिता देसाई तथा आशू

मराठी क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती ललिता देसाई तथा आशू यांचे दिर्घ आजाराने दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७५ वर्षाच्या होत्या.

## कॉ. रोझा देशपांडे

ज्येष्ठ साम्यवादी नेत्या, माजी खासदार कॉ. रोझा देशपांडे यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९२ वर्षाच्या होत्या.

## सरदार तारा सिंग

ज्येष्ठ भाजप नेते सरदार तारा सिंग यांचे दिर्घ आजाराने दिनांक १९ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते.

SKS

## डॉ. भाऊ लोखंडे

ज्येष्ठ मराठी सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, आणि आंबेडकर विचारवंत डॉ. भाऊ लोखंडे यांचे दिर्घ आजाराने दिनांक २२ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षाचे होते.

## श्रीमती आशालता वाबगांवकर

मराठी क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती आशालता वाबगांवकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २२ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७९ वर्षाच्या होत्या.

## श्री राजेंद्र देवळेकर

कल्याण डोबिंवली महानगरपालिकेचे माजी महापौर श्री राजेंद्र देवळेकर यांचे हृदयविका—याच्या झटक्याने दिनांक २२ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले.

## श्री सुरेश अंगडी

रेल्वे राज्यमंत्री श्री सुरेश अंगडी यांचे अल्पशा आजाराने दिनांक २३ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६४ वर्षाचे होते.

## श्रीमती सरोज सुखटणकर

मराठी क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती सरोज सुखटणकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २३ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षाच्या होत्या.

## श्री भुपेश पंडया

हिंदी चित्रपट सुष्टीतील अभिनेता श्री भुपेश पंडया यांचे दिर्घ आजाराने दिनांक २३ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४८ वर्षाचे होते.

## डॉ. शेखर बसू

ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ आणि अणूऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.शेखर बसू यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.

## श्री एस.पी. बालसुब्रमण्यम

सिनेसुष्टीतील प्रसिध्द गायक श्री एस.पी. बालसुब्रमण्यम यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षाचे होते.

## रामदास महाराज जाधव

राज्यातील वारक—यांच श्रध्दस्थान असलेल्या पंढरपूर येथील कैकाडी महाराज मठाचे विश्वस्त रामदास महाराज जाधव यांचे अल्पशा आजाराने दिनांक २५ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षाचे होते.

## श्री जसवंत सिंह

माजी केंद्रीयमंत्री श्री जसवंत सिंह यांचे दिर्घ आजाराने दिनांक २७ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते.

## भागवताचार्य वा.ना.उत्पात

सवरकरप्रेमी, पत्रकार, लेखक, प्रवचनकार आणि पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष भागवताचार्य वा.ना. उत्पात यांचे अल्पशा आजाराने दिनांक २८ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षाचे होते.

p/mc minutes

## प्रा.पुष्पा भावे

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका प्रा. पुष्पा भावे यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०३ ऑक्टोंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षाच्या होत्या.

## श्री. अविनाश खर्शीकर

मराठी कलाविश्वातील ज्येष्ठ अभिनेते श्री अविनाश खर्शीकर यांचे ह्दयविका—याच्या झटक्याने दिनांक ०८ ऑक्टोंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.

## श्री. रामविलास पासवान

केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री, लोकजनशक्ती पक्षाचे संस्थापक रामविलास पासवन यांचे ह्दयविका—याच्या झटक्याने दिनांक ०८ ऑक्टोंबर २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षाचे होते.

## श्री विश्वास जाधव

कुलगुरूंचे विश्वासू वाहन चालक श्री विश्वास जाधव यांचे अल्पशा आजाराने दिनांक ८ ऑक्टोबर २०२० रोजी निधन झाले.

वरील सर्व मान्यवरांच्या तसेच मुंबई विद्यापीठातील इतर शिक्षकेतर कर्मचार्यांच्या दुखद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विषयपत्रिकेवरिल आयत्या वेळी ठेवलेल्या विषयाबाबत चर्चेला सुरुवात झाली.

| | | |
|---|---|---|
| **बाब क्र.१** | दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (आयडॉल) अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेबाबत गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक समितीचा अहवाल. | परिक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | माननीय कुलगुरू यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या ऑनलाइन अंतिम वर्षाच्या परीक्षेत काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. ऑनलाईन परीक्षा प्रणालीच्या मुल्यांकनासाठी तांत्रिकदृष्ट्या स्थिर, सुरक्षित व प्रमानजोगी व्यासपीठ शोधण्याकरिता व परीक्षेत व्यत्यय न येता सुरळीतपणे कश्या घेता येईल याची तपासणी करण्याकरिता श्री राजेंद्र देशपांडे यांच्या अध्यक्ष्यतेखाली तांत्रिक समिती गठित करण्यात आली. मा.कुलगुरु यांनी प्र-कुलगुरू यांना सदर समितीचा अहवाल पटलावर ठेवण्यास सांगितले. प्र-कुलगुरु यांनी श्री देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पटलावर ठेवला व अहवालाबाबत सविस्तर विवेचन केले; सदर अहवाल हा प्रथम माहिती व तंत्रज्ञान मंडळापुढे ठेवण्यात आला व माहिती व तंत्रज्ञान मंडळाच्या शिफारशी या व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आल्या तसेच शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारित नियमपुस्तिका मधील परिच्छेद 3.3.1 नुसार तातडीच्या स्वरूपातील खरेदी करण्याबाबतच्या तरतुदीतकडे सदस्यांचे लक्ष वेधले. सदर चर्चेत सर्व सदस्यांनी सक्रीय सहभाग घेतला व | |

आपापली मते मांडली. सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला:-

1. याबाबत प्रथम गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावा जेणेकरून नेमक्या कुठे उणिवा झाल्या हे लक्षात येईल.
2. यापुढील परीक्षा कशा घेता येईल यासाठी खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली:-

   १. ॲड निल हेळेकर

   २. डॉ कविता लघाटे

   ३. श्री किशोर पाटील

   सदर समितीने दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षा घेण्याकरता दोन सेवा प्रदाता नेमावे का? तसेच याबाबत सेवा प्रदाता नेमण्याची कार्यप्रणाली बाबत विचार करण्यात यावा. परीक्षेबाबत काही तांत्रिक अडचण परत निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांकरिता पर्यायी व्यवस्था तयार करण्यात यावी ज्यात विद्यार्थ्यांना जवळच्या परीक्षा केंद्रात जावून परीक्षा देता येईल.सदर समितीने तातडीने त्यांचा अहवाल सादर करावा.सदर अहवालानुसार अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

३. प्रा. बी एन जगताप, श्री दीपककुमार मुकादम व प्रा. वैभव नरवडे यांचे तसेच काही शिक्षकांचे परीक्षा सुरळीत पार पाडण्याकरिता सहकार्य घेण्यात यावे.

४. परीक्षेसंदर्भात काही तातडीची अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार माननीय कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.

सर्व सदस्यांचे आभार व्यक्त करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्र-कुलगुरु यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(संजना सावंत)
सहा कुलसचिव

इतिवृत्त मंजूर

कुलगुरु

प्र-कुलगुरू

कुलसचिव (प्र)